माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१८०५**

**अपिलार्थी श्री. प्रविण माधवराव साळवे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र राज्य), "आरोग्य भवन"
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र राज्य), "आरोग्य भवन"
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१२.२०२२ | २९.१०.२०२५ | ०८.०२.२०२३ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०५.२०२३ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. २०.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"सर्व प्रकारच्या खरेदीपूर्व तपासणीसाठी अधिकारी कर्मचारी निवडसाठीचे निकषाबाबतचे मार्गदर्शक तत्व, नियम, परिपत्रक, अध्यादेश अथवा बैठकीचे इतिवृत्ताची साक्षांकित प्रत."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०८.०२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, खरेदीपूर्व तपासणीसाठी अधिकारी कर्मचारी असे नावाचे पद आस्तित्वात नाही. परंतु वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी साधनसामग्री व औषधी या बाबींचे तांत्रिक विनिर्देश निश्चित करण्यासाठी शासन निर्णय दि. ३१.१०.२०१७ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे दि. ०१.१२.२०१६ व भारत सरकार यांचे दि. १९.०८.२०२१ रोजीचे आदेशाची प्रत संलग्न करुन अपिलार्थींना दि. २९.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

..२/-

४. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०४.११.२०२५**

State Information Commission ★ Greater Mumbai ★